**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-४११ ००१**

राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा
(NTS) २०११-१२ इ. ८ वी साठी

राज्यस्तर परीक्षा दि. २० नोव्हेंबर २०११ राष्ट्रीयस्तर परीक्षा दि.१३मे २०१२

## माहितीपत्रक

१. योजनेचे उद्दिष्टः इ. ८ वी च्या अखेर प्रज्ञावान विद्यार्थ्यांचा शोध घेऊन बुध्दिमान विद्यार्थ्यांना सर्वोत्तम शिक्षण मिळण्याच्या दृष्टीने त्यांना आर्थिक सहाय्य करावे, या सहाय्यातून त्यांची बुध्दीमत्ता विकसित व्हावी आणि त्या विकसित बुध्दिमत्तेने त्या विद्यार्थ्यांनी आपली विद्याशाखा व राष्ट्र याची सेवा करावी. ही या योजनेची उद्दिष्टे आहेत.

२. विकेंद्रीकरण पध्दतीः राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली (एन.सी.इ.आर.टी.) यांनी २००७-०८ पासून राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा इ.८वी साठी दोन स्तरांवर घेण्याचे ठरविले आहे. (अ) राज्यस्तरीय प्रज्ञाशोध परीक्षाः महाराष्ट्र राज्यासाठी ही परीक्षा, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या मार्फत जिल्हयातील विविध केंद्रावर सर्व साधारण नोव्हेंबर महिन्याच्या दुसऱ्या-तिसऱ्या रविवारी घेण्यात येते.(यावर्षी दि. २० नोव्हेंबर २०११ रोजी ) (ब) राष्ट्रीयस्तर प्रज्ञाशोध परीक्षा : राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली (एन.सी.इ.आर.टी.) यांचेमार्फत सदर परीक्ष मे महिन्यात घेण्यात येईल. (दि. १३.०५.२०१२ रोजी) राष्ट्रीयस्तर परीक्षा महाराष्ट्रातील पुणे व मुंबई केंद्रावर होईल. राज्यस्तरीय NTS परीक्षा अणि NMMS परीक्षा यातून राष्ट्रीय स्तरासाठी निवड झालेल्या उमेदवारांनाच अंतिम परीक्षेस बसता येईल.

३. पात्रताः महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही शासनमान्य शाळेतील इ. ८वी मध्ये शिकत असलेल्या नियमित विद्यार्थी / विद्यार्थीनीस राज्यस्तर परीक्षेस बसता येते. त्यासाठी वयाची, उत्पन्नाची अगर किमान गुणांची अट नाही.तसेच कोणतीही पूर्व परीक्षा देण्याची अट नाही.

४. अर्ज करण्याची पध्दतः **१ ऑगस्टपासून** ऑनलाइन आवेदनपत्रे परिषेदच्या वेबसाईटवर (www.ms-ce.org) शाळांना उपलब्ध होतील. ती आवेदनपत्रे संबंधित प्रशालांनी ऑनलाइन भरावीत. ऑनलाइन भरलेल्या आवेदनपत्राच्या प्रिंटआऊट विद्यार्थी, पालक व मुख्याध्यापक यांच्या स्वाक्षरीसह S फॉर्म व रक्कम भरलेल्या SBI चलनासह शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी दिलेल्या मुदतीपूर्वी (दिनांक ०१सप्टेंबर,२०११ रोजी) त्यांच्याकडे सादर कराव्यात.

५. निवड पध्दतीः या शिष्यवृत्तीसाठी दोन स्तरावर परीक्षा घेण्यात येते.
(अ) राज्यस्तरीय प्रज्ञाशोध परीक्षा (ब) राष्ट्रीयस्तर प्रज्ञा शोध परीक्षा
महाराष्ट्रातील विविध केंद्रावर, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) किंवा शिक्षण निरीक्षक बृहन्मुंबई यांचेमार्फत महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद ही परीक्षा घेते. सदर परीक्षेचे वेळापत्रक व विषय खालीलप्रमाणे असतात.

| अ.क्र. | विषयाचे नाव | एकुण गुण | एकुण प्रश्न | कालावधी | वेळ | पात्रता गुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सामान्य बौध्दिक क्षमता चाचणी (General Mental Ability Test) | १०० | १०० | दीड तास (फक्त अपंगांसाठी ३० मिनिटे जादा वेळ) | ११.०० ते १२.३० | ४०% * |
| | | | विश्रांती १२.३० ते १३.३० | | | |
| २ | शालेय क्षमता चाचणी (Scholastic Aptitute Test) | १०० | १०० | दीड तास (फक्त अपंगांसाठी ३० मिनिटे जादा वेळ) | १३.३० ते १५.०० | ४० % * |

* (SC व ST यांचेसाठी पात्रता गुण ३२ % आहे.)
(अ) सामान्य बौध्दिक क्षमता चाचणी : (GMAT) ही मानसशास्त्रीय चाचणी असून त्यामध्ये कार्यकारण भाव विश्लेषण, संकलन इत्यादी संकल्पनांवर आधारित १०० बहुपर्यायी वस्तुनिष्ठ प्रश्न असतात.
(ब) शालेय क्षमता चाचणी: (SAT) ही सामान्यतः ८ वी पर्यंतच्या अभ्यासक्रमांवर आधारित असते. त्यामध्ये (१) सामान्य विज्ञान, (२) समाजशास्त्र (इतिहास, भूगोल, नागरिक शास्त्र) (३) गणित व भूमिती, असे तीन विषय असतात. या विषयांचे एकूण १०० प्रश्न सोडवावयाचे असतात.

सामान्य विज्ञान-३५ गुण + समाजशास्त्र(इतिहास, भूगोल, नागरिक शास्त्र)-३५गुण+ गणित व भूमिती-२० गुण+ सर्व विषयांचे विशेष काठिण्य प्रश्न १०= एकुण १०० गुण

६. **माध्यमः** प्रश्नपत्रिका मराठी, इंग्रजी, हिंदी, गुजराथी, उर्दु, सिंधी, कन्नड व तेलुगू या आठ माध्यमातून उपलब्ध असतील. यापैकी कोणतेही एकच माध्यम घेता येईल. विद्यार्थ्यांना मूळ माध्यमांव्यतिरिक्त इंग्रजी माध्यमाची प्रश्नपत्रिका मिळू शकेल.
दोन्ही प्रश्नपत्रिकांसाठी स्वतंत्र उत्तरपत्रिका दिल्या जातात. प्रत्येक प्रश्नक्रमांकापुढे वर्तुळे असतील. योग्य पर्यायाच्या क्रमांकाखाली वर्तुळ काळे करुन उत्तर नोंदवायचे असते.(सोबत उत्तरपत्रिकेचा नमुना दिला आहे.)



This document was created using SmartPDFCreator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

७.**परीक्षेचे मूल्यमापन:** विद्यार्थ्यांनी सोडविलेल्या उत्तरपत्रिकांची तपासणी संगणकामार्फत OMR पध्दतीने करण्यात येते. खबरदारीचे सर्व उपाय योजना बिनचूक गुणयादी तयार करणे. त्यामध्ये अनुसूचित जातीच्या व अनुसूचित जमातीच्या उमेदवारांचा समावेश असतो. महाराष्ट्रासाठी हा कोटा सध्या अनुसूचित जाती ७४, अनुसूचित जमाती -३७, सर्वसामान्य ३८५ एकूण ४९६ असा आहे. तसेच संबंधित संवर्गात ३%अपंगांसाठीचे आरक्षण आहे.

८. **राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा**: राज्यस्तरीय परीक्षेतून तयार केलेल्या NTS व NMMS विद्यार्थ्यांचा गुणवत्ता यादीतून राज्याला ठरवून दिलेल्या कोटयानुसार निवडलेल्या उमेदवारांनाच अंतिम परीक्षेस बसता येते. अंतिम परीक्षा राष्ट्रीय शैक्षणिक व प्रशिक्षण परिषद (NCERT) नवी दिल्ली यांचेमार्फत दरवर्षी साधारणत: मे महिन्यात मुंबई व पुणे येथे घेण्यात येते. (यावर्षी दि. १३ मे २०१२ रोजी) लेखी परीक्षेचे स्वरुप साधारणपणे राज्यस्तरीय परीक्षेप्रमाणे असते.

९. **शिष्यवृत्ती** : अखिल भारतीय पातळीवर शिष्यवृत्तींची संख्या १००० असून यासाठी SC साठी १५०, ST साठी ७५ आणि खुल्या प्रवर्गासाठी ७७५ शिष्यवृत्त्या दिलेला आहे. तसेच संबंधित संवर्गात ३ % अपंगासाठीचे आरक्षण असेल.

१०. **शिष्यवृत्ती दर:** शिष्यवृत्तीधारकांना खालीलप्रमाणे शिष्यवृत्ती देण्यात येईल.

| अ.क्र. | तपशील | दरमहा शिष्यवृत्ती रु. |
|---|---|---|
| १ | इ. ९ वी ते १० वी साठी | ५०० (वार्षिक रु. ६०००/-) |
| २ | शालांत परीक्षेनंतर + दोन स्तरावर दोन वर्ष | ५०० (वार्षिक रु. ६०००/-) |
| ३ | सर्व शांखांच्या प्रथम पदवीपर्यत (उदाB.A.,B.Com.,B.Sc.) | ५०० (वार्षिक रु. ६०००/-) |
| ३ | सर्व शांखांच्या द्वितीय पदवीपर्यत (पदव्युत्तर पदवीपर्यत) | ५०० (वार्षिक रु. ६०००/-) |
| ४ | Ph.D. साठी ४ वर्षापर्यंत (व्यवसायिक अभ्यासक्रम वगळून इतर शाखांसाठी) | विद्यापीठ आयोगाचे नियमानुसार मान्यदराने |

**NTS परीक्षेसंदर्भात मुख्याध्यापक आणि परीक्षार्थीसाठी सूचना-**

## शाळांनी ऑनलाइन आवेदनपत्रे भरण्यापूर्वी सर्व सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.

१. महाराष्ट्र शासन/केंद्र शासनमान्य शाळेत नियमितपणे इ. ८ वी वर्गात शिकत असणारे विद्यार्थीच या परीक्षेस बसण्यास पात्र असतील.

२. पूर्ण भरलेल्या ऑनलाइन आवेदनपत्रे प्रिंटआऊट विहीत परीक्षा शुल्कासह चलनाने (परीक्षा शुल्क रु. १२०) व शाळेच्या संलग्नता शुल्कासह (रु. १०० प्रति संस्था) शाळेच्या मुख्याध्यापकांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) किंवा शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई यांच्याकडे वेळापत्रकाप्रमाणे (दि. ०१.०९.२०११ पूर्वी) सादर करावीत. मुख्याध्यापकांनी शाळेतील विद्यार्थ्यांची फी, संस्था संलग्नता फी यांचे एकत्रित चलन स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखेतून "महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे" यांचे नावे काढावे.

३. अपूर्ण आवेदनपत्रे, स्वाक्षरी नसलेली आवेदनपत्रे विचारात घेतली जाणार नाही. ती कोणत्याही वेळी रद्द करण्यात येतील.

४. प्रशालेतील विद्यार्थी ज्या परीक्षा केंद्रातून परीक्षा देऊ इच्छितात त्या केंद्राचा ' केंद्रसंकेतांक ' आवेदनपत्रावर नोंदवावा. त्याचप्रमाणे शाळा संकेतांक समाविष्ट असलेल्या शाळेचा शिक्का, आवेदनपत्रावर असणे आवश्यक आहे. शाळा संकेतांक, विज्ञानपर्यवेक्षक आपल्या तालुक्याचे गटशिक्षण अधिकारी यांचेकडे मिळतील.

५. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने दिलेले प्रवेशपत्र विद्यार्थ्याने परीक्षेच्या वेळी परीक्षागृहात घेऊन जावे. ऑक्टोबरच्या तिसऱ्या आठवडयात सदर प्रवेशपत्रे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडे पाठविली जातील. ती संबंधित शाळांनी घेऊन जावीत.

६. विद्यार्थ्यांना परीक्षा सुरु होण्यापूर्वी किमान ३० मिनिटेअगोदर परीक्षेच्या ठिकाणी उपस्थित रहावे.

७. परीक्षा प्रवेशपत्रावर परीक्षार्थीनी मुख्याध्यापकांच्या उपस्थितीत स्वाक्षरी करावी. तसेच त्यावर मुख्याध्यापकांचा शिक्का व सही असावी.

८. सामान्य बौध्दिक क्षमता कसाटी (GMAT) व शालेय क्षमता कसोटी (SAT) या दोन्ही प्रश्न पत्रिकांसाठी स्वतंत्र उत्तरपत्रिका दिलेल्या असतात.

९. उत्तरपत्रिकेवर प्रश्नक्रमांकाच्या पुढे चार वर्तुळे दिली आहेत. योग्य पर्यायाचे पुढील वर्तुळे काळे करुन उत्तरे नोंदवावयाची आहेत.

१०. विद्यार्थ्यांनी परीक्षेस येताना स्वत:चे लेखनसाहित्य आणावयाचे आहे.

११. परीक्षेस येण्या-जाण्याचा खर्च परीक्षार्थींनी स्वत: करावयाचा आहे.

१२. राज्यस्तर परीक्षेतून निवड झालेल्या उमेदवारांना या कार्यालयामार्फत पत्राने कळविले जाते. उमेदवारांना आपला क्रमांक www.ms-ce.org या परिषदेच्या संकेतस्थळावर टाकून निवडीबाबतची स्थिती साधारणत: १५ मार्च नंतर निकाल जाणून घेऊ शकतील. तसेच एन.सी.इ.आर.टी. मार्फत निवड झालेल्या उमेदवारांना दि. १३ मे २०१२ रोजी होणाऱ्या राष्ट्रीयस्तर परीक्षेचे प्रवेशपत्र पाठविली जाईल. प्रशालांनी विद्यार्थ्यांची गुणयाद्या शिक्षणाधिकारी (माध्य.) यांचेकडून प्राप्त करुन घ्यावयाच्या आहेत.

१३. परीक्षार्थीनी हे लक्षात घ्यावे की, ही निवड परीक्षा आहे, पात्रता परीक्षा नव्हे.

१४. सदर परीक्षेसाठी फेरपडताळणीसाठी किंवा पुनर्मुल्यांकनाची पध्दत नाही.

१५. फक्त SC,ST जातीच्या उमेदवारांनी आवेदनपत्रासोबत जातीच्या दाखल्याची प्रमाणित सत्यप्रत प्रशालेत सादर करावीत. अपंग उमेदवारांनी सक्षम अधिकाऱ्याच्या दाखल्याची सत्यप्रत प्रशालेत सादर करावीत. जातीचा दाखला तसेच अपंग विद्यार्थ्याबाबतचा दाखला सक्षम अधिकाऱ्यांचा असणे आवश्यक आहे.याबाबत आवेदनपत्रातील माहितीची मुख्याध्यापकांनी अभिलेखावरुन तपासून / खात्री करुनच आवेदनपत्रे परिषदेकडे पाठवावीत.आरक्षणाचा लाभ मिळण्यासाठी परीक्षेपूर्वी दाखल्याच्या सत्यप्रती प्रशालेकडे सादर होणे आवश्यक आहे अन्यथा याबाबत कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. आवेदनपत्रासोबत कोणतेही दाखले या कार्यालयास पाठवू नयेत.

१६. उत्तरपत्रिकेचे मुल्यांकन करताना वजा गुण (Negative Marking) पध्दतीचा अवलंब केला जात नाही.

१७. ऑनलाइन आवेदनपत्रे भरणे, प्रिंटआऊट आवेदनपत्रे विद्यार्थी, पालक यांच्या स्वाक्षरीसह एकत्रित करणे, दोन S फॉर्म व फी च्या आवश्यक SBI चलनासह शिक्षणाधिकारी (माध्य.) यांचेकडे सादर करणे ही प्रशालेच्या मुख्याध्यापकांची जबाबदारी आहे. कोणत्याही परिस्थितीत पालकांना



This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

आवेदनपत्रे नेण्यासाठी / भरलेली आवेदनपत्रे सादर करण्यासाठी शिक्षणाधिकारी कार्यालयात पाठविण्यात येऊ नये. तसेच विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे शाळेमार्फत एस. फॉर्म सह सादर होणे अपेक्षित आहे. प्रशालेने प्रवेशपत्रे ऑक्टोबरच्या तिसऱ्या आठवडयात आणि गुणयाद्या मार्चच्या पहिल्या आठवडयात शिक्षणाधिकारी कार्यालयातून घेऊन जाणे अपेक्षित आहे.

१८.आवेदनपत्रे सादर करण्याच्या अंतिम दिनांक व शुल्काचे दर :

| अ.क्र. | तपशील | अंतिम दिनांक | शुल्क रु. | |
|---|---|---|---|---|
| १ | नियमित | ०१.०९.२०११ | १२०/- | संलग्नता फी |
| २ | विलंब शुल्कासह | ३०.०९.२०११ | २२०/- | संस्था प्रति शैक्षणिक वर्षासाठी |

This document was created using SmartPDF Creator. To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

## Instructions to Candidates/Principal of School
## State Level National Talent Search Examination 2011-12 :
## Std.VIII

The School persons should read the instructions carefully before filling the online application.

1. Only Regular Students studying in schools recognised by Maharashtra State/Central Government are eligible.
2. Printouts of filled up forms alongwith examination fee (Rs. 120/-per student), affiliation (Rs. 100/- per institute per academic year) paid by single challan are to submitted to Education Officer (secondary)/Education Inspector (in case of Mumbai) / Examination Centre according to time table before dt.01/09/2011. Fee & affiliation fee is to be paid by SBI challan infavour of MSCE Pune.
3. Incomplete / wrongly filled in application forms are liable to be rejected & no correspondence will be entertained in connection with it.
4. Centre code of concerning centre from which the school students are going to appear must be given. The school stamp containing school code is necessary school code can be known by Block Education Officer or Science Supervisor.
5. Before entering the examination hall the student should bring the admission card given by Maharashtra State Council of Examination. Admission cards will be sent to Education Officers/Education Inspectors in third week of October. The schools will collect then form E.O./ E.I.
6. The student is expected to be present in examination hall ३० minutes prior to the commencement of the examination.
7. Signature of student on hall ticket to be done in presence of school head master and the H.M. should sign it with school seal on it.
8. Both answer sheets i.e. GMAT & SAT will be given separately.
9. Answers to questions are to be noted by encirculing (darkening) the appropriate circles by black ball-pen only.
10. The students will come alongwith their own writing material.
11. Candidate will not be given any to and fro allowance.
12. Candidates selected for national level examination from State Level exam shall be informed by this office. However the candidates can know their result of state level exam by entering their seat number on MSCE website www.ms-ce.org. The admission cards for national level examinations to be held on 13 May 2012 shall be send by NCERT, New delhi.The Schools should collect the " school wise result lists "form E.O.(Sec.)/E.I.
13. The students should remember that this is selection examination & not eligibity examination.
14. Revaluation facility is not available for this examination.
15. Only SC, ST candidates shall submit copy of caste certificate in their school. Disable students also required to submit the true copy of certificate given by competent authority. Caste certificate & disable certificate given by competent authorities shall be considered. The

school H.M. should confirm the information given in the application form from originals and school record and then send the application forms. To avail the reservation facility true copies of necessary documents must be submitted to schools no complain shall be intertained afterwords. No certificate/true copies or any document should be attached alongwith application form.

16. While assessing the answer papers no Negative Marketing System is followed.

17. Filling up of online forms shall be done by school only Printouts of application forms with signatures of students & parents on it shall be submitted to E.O./E.I. These documents will be submitted alongwith 2 copies of S.form & single challan of SBI for each school. This should be done only by school. In any case the guardians should not be refered to contact E.O./E.I. or
higher authority Filled up Application Forms shall be rereived only through schools. Admission cards and school result will be available to E.O./E.I. available in 3 rd week of October and first week of March and to be collected by schools.

18. Last date & rate of fees for submission of application form.Sr.No. Discription Last Date Fee Rs. Affiliation 1 Regular 01.09.11 120/- Rs.100/- per
2 Late 30.09.11 220/- institute per Academic Year

**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-४११ ००१**

राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थी शिष्यवृत्ती योजना, परीक्षा
(NMMS) २०११-१२ इ. ८ वी साठी

परीक्षा दि. २० नोव्हेंबर २०११

## माहितीपत्रक

१) योजनेची उद्दिष्टः इ. ८ वी च्या अखेर प्रज्ञावान विद्यार्थ्यांचा शोध घेऊन बुध्दिमान विद्यार्थ्यांना सर्वोत्तम शिक्षण मिळण्याच्यादृष्टीने त्यांना आर्थिक सहाय्य करावे, या सहाय्यातून त्यांची बुध्दीमत्ता विकसित व्हावी आणि त्या विकसित बुध्दिमत्तेने त्या विद्यार्थ्यांनी आपली विद्याशाखा व राष्ट्र याची सेवा करावी. ही या योजनेची उद्दिष्टे आहेत.

२) विकेंद्रीकरण पध्दतीः केंद्रशासनामार्फत राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली (एन.सी.इ.आर.टी.) यांनी २००७-०८ पासून आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी सदरची परीक्षा इ.८वी साठी सुरु केली आहे. महाराष्ट्र राज्यासाठी ही परीक्षा महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या मार्फत जिल्हयातील विविध केंद्रावर सर्व साधारण नोव्हेंबर महिन्याच्या दुसऱ्या-तिसऱ्या रविवारी घेण्यात येते.(यावर्षी दि. २० नोव्हेंबर २०११ रोजी ) महाराष्ट्रासाठी उपलब्ध कोटा जिल्हानिहाय विद्यार्थी संख्येनुसार दरवर्षी केंद्रशासनाकडून राज्यासाठी निश्‍चित केलेल्या कोटयानुसार दरमहा रु. ५००/- शिष्यवृत्ती दिली जाते.

३) पात्रताः महाराष्ट्र राज्याती ल कोणत्याही शासनमान्य अनुदानित, स्थानिक स्वराज्य संस्थेतील इ. ८वी मध्ये शिकत असलेल्या आणि खालील अटी पूर्ण करणाऱ्या नियमित विद्यार्थी / विद्यार्थीनीस या परीक्षेस बसता येते. <u>विनाअनुदानित शाळेतील विद्यार्थी या परीक्षेसाठी अपात्र आहेत.</u>

४) अटः पालकांचे (आई व वडिल दोघांचे मिळून) वार्षिक उत्पन्न १,५०,०००/- पेक्षा कमी असावे. नोकरीत असलेल्या पालकांनी आपल्या आस्थापनाप्रमुखांचा सन २००९-१० च्या आर्थिक वर्षाचा दाखला जोडावा व इतरांनी तहसिलदारांचा / तलाठयांचा सन २०१०-११ या आर्थिक वर्षाचा दाखला जोडावा. विद्यार्थे इ. ७ वी मध्ये ५५ % पेक्षा अधिक गुण मिळून उत्तीर्ण झालेला असावा. ( आरक्षित विद्यार्थ्यांना SC/ST/VJ/NT/DT/OBC/SPBC ५०% पेक्षा अधिक गुणांची आवश्यकता)

५) अर्ज करण्याची पध्दतीः **<u>१ ऑगस्टपासून</u>** ऑनलाइन आवेदनपत्रे परिषेदच्या वेबसाईटवर (www.ms-ce.org) शाळांना उपलब्ध होतील. ती आवेदनपत्रे संबंधित प्रशालांनी ऑनलाइन भरावीत. ऑनलाइन भरलेल्या आवेदनपत्राच्या प्रिंटआऊट विद्यार्थी, पालक व मुख्याध्यापक यांच्या स्वाक्षरीसह S फॉर्मच्या दोन प्रतीसह व रक्कम भरलेल्या SBI चलनासह दिलेल्या मुदतीपूर्वी (दिनांक ०१सप्टेंबर,२०११ रोजी) त्यांच्याकडे सादर कराव्यात.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

६) NMMS परीक्षा: महाराष्ट्रातील विविध केंद्रावर, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) किंवा शिक्षण निरीक्षक बृहन्मुंबई यांचेमार्फत महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद ही परीक्षा घेते. सदर परीक्षेचे वेळापत्रक व विषय खालीलप्रमाणे असतात.

| अ.क्र. | विषयाचे नाव | एकूण गुण | एकूण प्रश्न | कालावधी | वेळ | पात्रता गुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सामान्य बौध्दिक क्षमता चाचणी (General Mental Ability Test) | १०० | १०० | दीड तास (फक्त अपंगांसाठी ३० मिनिटे जादा वेळ) | ११.०० ते १२.३० | ४०% * |
| विश्रांती १२.३० ते १३.३० | | | | | | |
| २ | शालेय क्षमता चाचणी (Scholastic Aptitute Test) | १०० | १०० | दीड तास (फक्त अपंगांसाठी ३० मिनिटे जादा वेळ) | १३.३० ते १५.०० | ४० % * |

* (SC,ST,VJ,NT,DT,OBC,SPBC) यांचेसाठी पात्रता गुण ३२ % आहे.)

७) सामान्य बौध्दिक क्षमता चाचणी : (GMAT) ही मानसशास्त्रीय चाचणी असून त्यामध्ये कार्यकारण भाव विश्लेषण, संकलन इत्यादी संकल्पनांवर आधारित १०० बहुपर्यायी वस्तुनिष्ठ प्रश्न असतात.

८.शालेय क्षमता चाचणी: (SAT) ही सामान्यत: ८ वी पर्यंतच्या अभ्यासक्रमांवर आधारित असते. त्यामध्ये (१) सामान्य विज्ञान, (२) समाजशास्त्र (इतिहास, भूगोल, नागरिक शास्त्र) (३) गणित व भूमिती, असे तीन विषय असतील. या विषयांचे एकूण १०० प्रश्न सोडवावयाचे असतात. सामान्य विज्ञान-३५ गुण + समाजशास्त्र(इतिहास, भूगोल, नागरिक शास्त्र)-३५गुण+ गणित व भूमिती-२० गुण+ सर्व विषयांचे विशेष काठिण्य प्रश्न १०= एकूण १०० गुण

९. माध्यम: प्रश्नपत्रिका मराठी, इंग्रजी, हिंदी, गुजराथी, उर्दू, सिंधी, कन्नड व तेलुगू या आठ माध्यमातून उपलब्ध असतील. यापैकी कोणतेही एकच माध्यम घेता येईल. सर्व माध्यमातील विद्यार्थ्यांना मूळ माध्यमांव्यतिरिक्त इंग्रजी माध्यमाची प्रश्नपत्रिका दिली जाते.

दोन्ही प्रश्नपत्रिकांसाठी स्वतंत्र उत्तरपत्रिका दिल्या जातात. प्रत्येक प्रश्नक्रमांकापुढे वर्तुळे असतील. योग्य पर्यायाच्या क्रमांकाखाली वर्तुळ काळे करुन उत्तर नोंदवायचे असते. नेहमीच्या एन.टी.एस. परीक्षेसारखी ही परीक्षा असते.

१०.परीक्षेचे मूल्यमापन: विद्यार्थ्यांनी सोडविलेल्या उत्तरपत्रिकांची तपासणी संगणकामार्फत OMR पध्दतीने करण्यात येते. खबरदारीचे सर्व उपाय योजन बिनचूक गुणयादी तयार करणे. त्यामध्ये अनुसूचित जाती च्या व अनुसूचित जमातीच्या विमुक्त व भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्गीयांसह अपंग विद्यार्थी आरक्षणातील केंद्रशासनाने निश्चित केलेल्या कोटयानुसार विद्यार्थ्यांची निवड जिल्हानिहाय संवर्गनिहाय करण्यात येईल.

११. शिष्यवृत्ती: NMMS परीक्षेतून महाराष्ट्रासाठी केंद्रशासनाने निश्चित करुन दिलेलया कोटयानुसार विद्यार्थी जिल्हानिहाय संवर्गनिहाय निवडले जातात. अखिल भारतीय पातळीवर शिष्यवृत्तीची संख्या एक लाख आहे.

१२.शिष्यवृत्ती दर: NMMS शिष्यवृत्ती धारकांना खालीलप्रमाणे शिष्यवृत्ती देण्यात येते.

| अ.क्र | तपशील | दरमहा शिष्यवृत्ती रु. |
|---|---|---|
| १ | NMMS शिष्यवृत्ती इ. ९ वी ते १२ वी पर्यंत फक्त | ५०० (वार्षिक रु. ६०००/-) |

<u>फक्त NTS राष्ट्रीयस्तर परीक्षेसाठी निवड झालेल्या NMMS विद्यार्थ्यांसाठी.</u>

१३. NMMS परीक्षेतून आणि NTS ______परीक्षेतून एकत्रित गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांची NTS राष्ट्रीयस्तर परीक्षा (दि. १३ मे२०१२) साठी निवड केली जाईल. महाराष्ट्रासाठी हा कोटा सध्या अनुसूचित जाती ७४, अनुसूचित जमाती -३७, सर्वसाधारण (VJ,NT,DT,OBC,SPBCसह) एकूण ३८५ एकूण ४९६ असा आहे. (३%अपंगांसाठी आहे.)

१४. राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा (राष्ट्रीयस्तर ): NCERT नवी दिल्ली यांचेमार्फत साधारण मे महिन्यात घेण्यात येते. महाराष्ट्रासाठी यावर्षी १३ मे २०१२ रोजी सदर परीक्षा पुणे व मुंबई या केंद्रावर घेण्यात येईल. लेखी परीक्षेचे स्वरुप सर्वसाधारणपणे राज्यस्तरीय परीक्षेप्रमाणेच असेल.

१५.राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा: मुलाखत- राष्ट्रीयस्तर लेखी परीक्षेतून निवडलेल्या उमेदवारांची तोंडी परीक्षा (मुलाखत) जुलै / ऑगस्ट महिन्यात होते. मुलाखतीसाठी पात्र उमेदवारालाच रजिस्टर पत्राने कळविले जाते. मुलाखतीस येणाऱ्या मुलाला द्वितीय दर्जाचे रेल्वेचे जाण्या-येण्याचे भाडे दिले जाते.

१६.राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा शिष्यवृत्तीचे दर-

| अ.क्र. | तपशील | दरमहा शिष्यवृत्ती रु. |
|---|---|---|
| १ | इ. ९ वी ते १२ वी साठी | ५०० (वार्षिक रु. ६०००/-) |
| २ | शिष्यवृत्तीधारकांसाठी सर्व शांखांचा प्रथम पदवीपर्यत (उदा. B.A.,B.Com.,B.Sc.) | ५०० (वार्षिक रु. ६०००/-) |



This document was created using SmartPDFCreator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

| | | |
|---|---|---|
| ३ | सर्व शाखांचा द्वितीय पदवीपर्यत (पदव्युत्तर पदवीपर्यत) | ५०० (वार्षिक रु. ६०००/-) |
| ४ | Ph.D. साठी ४ वर्षापर्यंत (व्यवसायिक अभ्यासक्रम वगळून इतर शाखांसाठी) | विद्यापीठ आयोगाचे नियमानुसार मान्यदराने |

## NMMS परीक्षेसंदर्भात मुख्याध्यापक आणि परीक्षार्थीसाठी सूचना-

### शाळांनी ऑनलाइन आवेदनपत्रे भरण्यापूर्वी सर्व सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.

१ शाळा राज्य शासन व केंद्रशासन मान्यताप्राप्त असावी. तसेच महाराष्ट्रात शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी अनुदानित शाळेत नियमितपणे इ. ८ वी वर्गात शिकत असणारे व इ. ७ वी त ५५ % पेक्षा जास्त गुण (मागासवर्गीयांसाठी ५०% ) गुण प्राप्त व ज्यांचे आई-वडिलांचे एकत्रित उत्पन्न १,५०,००० पेक्षा कमी आहे. असे विद्यार्थीस या परीक्षेस बसण्यास पात्र आहेत. विनाअनुदानित शाळेतील विद्यार्थी या परीक्षेस बसण्यास पात्र नाहीत.

२. ऑनलाइन भरलेल्या आवेदनपत्रांची प्रिंटआऊट विद्यार्थी, पालक व मुख्याध्यापक यांच्या स्वाक्षरीने विहीत परीक्षा शुल्कासह चलनाने (परीक्षा शुल्क रु. १०० प्रति विद्यार्थी) व शाळेच्या संलग्नता शुल्कासह ( रु. १०० प्रति संख्या) शाळेच्या मुख्याध्यापकांनी शिक्षणधिकारी (माध्यमिक) किंवा शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई यांच्याकडे (दि. ०१.०९.२०११ पूर्वी) सादर करावीत.मुख्याध्यापकांनी शाळेतील विद्यार्थ्यांची फी, संस्था संलग्नता फी यांचे एकत्रित चलन स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखेतून "महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे" यांचे नावे काढावे.

३. अपूर्ण आवेदनपत्रे, स्वाक्षरी नसलेली आवेदनपत्रे विचारात घेतली जाणार नाही. ती कोणत्याही वेळी रद्द करण्यात येतील. आणि याबद्दल कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

४. प्रशालेतील विद्यार्थी ज्या परीक्षा केंद्रातून परीक्षा देऊ इच्छितात त्या केंद्राचा ' केंद्रसंकेतांक ' आवेदनपत्रावर नोंदवावा. त्याचप्रमाणे शाळा संकेतांक समाविष्ट असलेल्या शाळेचा शिक्का, आवेदनपत्रावर असणे आवश्यक आहे. शाळा संकेतांक, विज्ञानपर्यवेक्षक/ आपल्या तालुक्याचे गटशिक्षण अधिकारी यांचेकडे मिळतील.

५. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे प्रवेशपत्र विद्यार्थ्याने परीक्षेच्या वेळी परीक्षागृहात घेऊन जावे. ऑक्टोबरच्या तिसऱ्या आठवडयात सदर प्रवेशपत्रे शिक्षरणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडे पाठविली जातील. ती संबंधित शाळांनी घेऊन जावीत.

६. परीक्षा सुरु होण्यापूर्वी किमान ३० मिनिटेअगोदर परीक्षेच्या ठिकाणी उपस्थित रहावे.

७. परीक्षा प्रवेशपत्रावर परीक्षार्थीनी मुख्याध्यापकांच्या उपस्थितीत स्वाक्षरी करावी. तसेच त्यावर मुख्याध्यापकांचा शिक्का व सही असावी.

८. सामान्य बौध्दिक क्षमता कसाटी (GMAT) व शालेय क्षमता कसोटी (SAT) या दोन्ही प्रश्न पत्रिकांसाठी स्वतंत्र उत्तरपत्रिका दिलेल्या असतात.

९. उत्तरपत्रिकेवर प्रश्नक्रमांकाच्या पुढे चार वर्तुळे दिली आहेत. योग्य पर्यायाचे पुढील वर्तुळे काळे करुन उत्तरे नोंदवावयाची आहेत.

१०. विद्यार्थ्यांनी परीक्षेस येताना स्वत:चे लेखनसाहित्य आणावयाचे आहे.

११. परीक्षेस येण्या-जाण्याचा खर्च परीक्षार्थीनी स्वत: करावयाचा आहे.

१२. NMMS मधूनNTSराष्ट्रीयस्तर परीक्षेसाठी (दि. १३मे २०१२ साठी) निवड झालेल्या उमेदवारांना पत्राने कळविले जाते. NCERT मार्फत प्रवेशपत्रे पाठविली जाते. NMMS शिष्यवृत्तीधारकांची निवडयादी तसेच प्रशालेतील सर्व विद्यार्थ्यांची गुणयादी शिक्षणाधिकारी (माध्य.) यांचेकडे पाठविण्यात येते. प्रशालेने ती घेऊन जाणे अपेक्षित आहे. उमेदवार www.ms-ce.org या परिषदेच्या संकेतस्थळावर साधारण १५ मार्च नंतर निकाल जाणून घेऊ शकता.

१३. परीक्षार्थीनी हे लक्षात घ्यावे की, ही निवड परीक्षा आहे, पात्रता परीक्षा नव्हे.

१४.सदर परीक्षेसाठी फेरपडताळणी किंवा पुर्नमुल्यांकनाची पध्दत नाही.

१५.SC,ST,VJ,NT,DT,OBC,SPBC जातीच्या उमेदवारांनी आवेदनपत्रासोबत जातीच्या / अपंगत्वाच्या दाखल्याची प्रमाणित सत्यप्रत प्रशालेत सादर करावीत. अपंग उमेदवारांनी सक्षम अधिकांऱ्याच्या दाखल्याची सत्यप्रत प्रशालेत सादर करावीत. सर्व उमेदवारांनी तलाठी / तहसिलदार यांच्या उत्पन्नाच्या दाखल्याची सत्यप्रत संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांकडे सादर करावी. आरक्षणाचा लाभ मिळविण्यासाठी परीक्षेपूर्वी दाखल्याच्या सत्यप्रती प्रशालेकडे सादर होणे आवश्यक आहे अन्यथा याबाबत कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. आवेदनपत्रासोबत कोणतेही दाखले या कार्यालयासा पाठवू नये. उत्पन्नाचा दाखला, जातीचा दाखला तसेच अपंग विद्यार्थ्याबाबतचा दाखला सक्षम अधिकाऱ्यांचा असणे आवश्यक आहे. तिन्ही मुद्दयांबाबत आवेदनपत्रातील माहिती मुख्याध्यापकांनी त्यांचे मूळ अभिलेखावरुन तपासून / खात्री करुनच आवेदनपत्रे परिषदेकडे पाठवावीत.

१६. उत्तरपत्रिकेचे मुल्यांकन करताना वजा गुण (Negative Marking) पध्दतीचा अवलंब केला जात नाही.

१७. ऑनलाइन आवेदनपत्रे भरणे, प्रिंटआऊट आवेदनपत्रे विद्यार्थी, पालक यांच्या स्वाक्षरीसह एकत्रित करणे, दोन S फॉर्म व फी च्या आवश्यक चलनासह शिक्षणाधिकारी (माध्य.)/ परीक्षा केंद्र यांचेकडे सादर करणे. ही प्रशालेच्या मुख्याध्यापकांची जबाबदारी आहे. कोणत्याही

This document was created using SmartPDFCreator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

परिस्थितीत पालकांना आवेदनपत्रे नेण्यासाठी / भरलेली आवेदनपत्रे सादर करण्यासाठी शिक्षणाधिकारी कार्यालयात पाठविण्यात येऊ नये. तसेच विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे शाळेमार्फत एस. फॉर्म सह सादर होणे अपेक्षित आहे. प्रशालेने प्रवेशपत्रे ऑक्टोबरच्या तिसऱ्या आठवडयात आणि गुणयाद्या मार्चच्या पहिल्या आठवडयात शिक्षणाधिकारी कार्यालयातून परीक्षा केंद्रावरुन घेऊन जाणे अपेक्षित आहे.

१८.आवेदनपत्रे सादर करण्याच्या अंतिम दिनांक व शुल्काचे दर :

| अ.क्र. | तपशील | अंतिम दिनांक | शुल्क रु. | |
|---|---|---|---|---|
| १ | नियमित | ०१.०९.२०११ | १००/- | संलग्नता फी |
| २ | विलंब शुल्कासह | ३०.०९.२०११ | २००/- | संस्था प्रति शैक्षणिक वर्षासाठी |

## Instructions to Candidates/Principal of School National Means Cum Merit Scholarship Examination 2011-12 : Std.VIII

**The School persons should read the instructions carefully before filling the online application.**

1. Only Regular Students studying in schools recognised by Maharashtra State/Central Government are eligible. The school must be also your school / school run by local body / private aided school. Concerning student should be regular student huring more than 55 % (50 % incased backward classes) marks while promoting from VII Std. to VIII Std.th
2. Printouts of filled up forms alongwith examination fee (Rs.100/-per student), affiliation (Rs. 100/- per institute per academic year) paid by single challan are to submitted to Education Officer (secondary)/Education Inspector (in case of Mumbai) /Examination Centre according to time table before dt.01/09/2011. Fee & affiliation fee is to be paid by SBI challan infavour of MSCE Pune.
3. Incomplete / wrongly filled in application forms are liable to be rejected & no correspondence will be entertained in connection with it.
4. Centre code of concerning centre from which the school students are going to appear must be given. The school stamp containing school code is necessary school code can be known by Block Education Officer or Science Supervisor.
5. Before entering the examination hall the student should bring the admission card given by Maharashtra State Council of Examination. Admission cards will be sent to Education Officers/ Education Inspectors / Examination Centers in third week of October. The schools will collect then form E.O./ E.I./ Examination Center.
6. The student is expected to be present in examination hall 30 minutes prior to the commencement of the examination.
7. Signature of student on hall ticket to be done in presence of school head master and the H.M. should sign it with school seal on it.
8. Both answer sheets i.e. GMAT & SAT will be given separately.
9. Answers to questions are to be noted by encirculing (darkening) the appropriate circles by black ball-pen only.
10. The students will come alongwith their own writing material.
11. Candidate will not be given any to and fro allowance.
12. Candidates selected for national level examination from State Level exam shall be informed by this office. However the candidates can know their result of state level exam by entering their seat number on MSCE website www.ms-ce.org. The admission cards for national level examinations to be held on 13May 2012 shall be send by NCERT, New Delhi.The Schools should collect the " school wise result lists "form E.O. (Sec.)/E.I./Examination Center.
13. The students should remember that this is selection examination & not eligibity examination.
14. Revaluation facility is not available for this examination.
15. Only SC,ST,VJ,NT,DT,OBC,SBC candidates shall submit copy of caste certificate in their school. Disable students also required to submit the true copy of certificate given by competent authority.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

Caste certificate & disable certificate given by competent authority shall be considered. The school H.M.should confirm the information given in the application form from originals and school record and then send the application forms. To avail the reservation facility true copies of necessary documents must be submitted to schools no complain shall be intertained afterwords. No certificate/true copies or any document should be attached alongwith application form.

१६. While assessing the answer papers no Negative Marketing System is followed.

17. Filling up of online forms shall be done by school only Printouts of application forms with signatures of students & parents on it shall be submitted to E.O./E.I./Examination Center These documents will be submitted alongwith 2 copies of S.form & single challan of SBI for each school. This should be done only by school. In any case the guardians should not be refered to contact E.O,/E.I./Examination Center or higher authority. Filled up Application Forms shall be rereived only through schools.Admission cards and school result will be available to E.O./E.I./Examination Center available in 3 rd week of October and first week of March and to be collected by schools.

18. Last date & rate of fees for submission of application form.

| Sr.No. | Discription | Last Date | Fee Rs. | Affiliation |
|---|---|---|---|---|
| 1 | Regular | 01.09.11 | 100/- | Rs.100/- per institute perAcademic Year |
| 2 | Late | 30.09.11 | 220/- | |

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com